**अनुसूचित जमाती प्रवर्गातील उद्योजकांसाठी विशेष सामुहिक प्रोत्साहन योजनेसाठी आदिवासी उपयोजनेंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता निधी वितरीत करण्याबाबत. ( लेखाशिर्ष २८५२ ॲ०१३)**

**महाराष्ट्र शासन.**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः बीयुडी-२०१७/प्र.क्र.२४/कार्यासन.६.**
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख: - २८ फेब्रुवारी, २०१८.

वाचा -

१) वि. वि. शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७ /प्र.क्र.६८ / अर्थ-३, दि. ०१.०४.२०१७.
२) वि. वि, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७ /प्र.क्र.७५ / अर्थ-३, दि. १८.०४.२०१७.
३) वि. वि, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७ /प्र.क्र.९४ / अर्थ-३, दि. ३०.०६.२०१७
४) वि. वि, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७ /प्र.क्र.७५/ अर्थ-३, दि. ०६.१२.२०१८
५) उद्योग,उर्जा व कामगार विभाग,नस्ती क्र. साप्रोयो- २०१८ /प्र. क्र.१६/ उदयोग -८.

**शासन निर्णय -**

अनुसूचित जमाती प्रवर्गातील उद्योजकांसाठी विशेष सामुहिक प्रोत्साहन योजनेसाठी आदिवासी उपयोजनेंतर्गत मागणी क्र.टी-५, २८५२, उद्योग, ८०- सर्वसाधारण, ७९६- जनजाती क्षेत्र उपयोजना, (०१) (०२) अनुसूचित जमाती प्रवर्गातील उद्योजकांसाठी विशेष सामुहिक प्रोत्साहन योजना ( २८५२ ए०१३ ) या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ या वर्षात रु.१०.०० कोटी इतका निधी अर्थसंकल्पित केला आहे.

२ अनुसूचित जमाती प्रवर्गातील उद्योजकांसाठी विशेष सामुहिक प्रोत्साहन योजनेंतर्गत अनावर्ती निधी म्हणून आदिवासी विकास विभागाकडून सन २०१७-१८ या वर्षाकरिता मागणी क्र.टी-५, २८५२, उद्योग, ८०- सर्वसाधारण, ७९६- जनजाती क्षेत्र उपयोजना, (०१) (०२) अनुसूचित जमाती प्रवर्गातील उद्योजकांसाठी विशेष सामुहिक प्रोत्साहन योजना ( २८५२ ए०१३ ) ३३- अर्थसहाय्य या लेखाशिर्षाखाली ८० % च्या मर्यादेत **रु. ८.०० कोटी ( रुपये आठ कोटी फक्त )** इतका निधी नियंत्रक अधिकारी, प्रधान सचिव, ( उद्योग) उद्योग उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांना अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर वितरीत करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

३. या निधीचा विनियोग फक्त आदिवासी उद्योजकांसाठीच केला जाईल याची दक्षता नियंत्रक अधिकारी यांनी घ्यावी.

**४. उपरोक्त वितरीत केलेला निधी या प्रकल्पाच्या मंजूर प्रशासकीय मान्यता रकमेच्या मर्यादेत करण्याची तसेच त्यानुषंगाने निधी खर्च करण्यासंबंधीच्या नियमांचे पालन करण्याची दक्षता नियंत्रक अधिकारी यांनी घ्यावी.**

५. सदर वितरीत निधी अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर (BEAMS) खर्चासाठी नियंत्रक अधिकारी यांना सुपूर्द करण्यात येत आहे. सदर निधी वेळोवेळी निर्गमित सूचनांनुसार व वित्त विभागाच्या वित्तीय नियमानुसार खर्च करण्याची दक्षता नियंत्रक अधिका-यांनी घ्यावी.

६. उपरोक्त आदेश वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र अर्थसं-२०१७ /प्र.क्र.७५ / अर्थ-३, दि. १८.०४.२०१७, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. . अर्थसं-२०१७ /प्र.क्र.७५/ अर्थ-३, दि. ०६.०२.२०१८ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराअंतर्गत निर्गमित करण्यात येत आहेत.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२२३१७०५५६३९२४असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Ravindra Digambarrao Aute

Digitally signed by Ravindra Digambarrao Aute
DN: cn=Ravindra Digambarrao Aute, o=Tribal Development Department, ou=Government of Maharashtra, email=rajendra.aute@nic.in, c=IN
Date: 2018.02.28 16:10:51 +05'30'

**रविंद्र दि.औटे**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. प्रधान सचिव ( उर्जा ),उद्योग उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
२. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
३. अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे /नाशिक / अमरावती / नागपूर.
४. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ५ वा माळा, विधानभवन, मुंबई.
५. महालेखापाल (लेखापरिक्षा ) /(लेखा व अनुज्ञेयता ), महाराष्ट्र १ / २, मुंबई / नागपूर.
६. वित्त विभाग ( अर्थ-१९ ) / ( व्यय-१४ ) मंत्रालय, मुंबई-३२
७. निवडनस्ती, कार्यासन- ०६, आदिवासी विकास विभाग.